**गरिबी बरोबर दोन हात करत शिक्षण घेऊन,**
**नोकरी - व्यवसायात असलेल्या गोरगरिबांच्या लेकरांनी,**
**गोरगरिबांच्याच लेकरांच्या शैक्षणिक विकासासाठी,**
**कर्तव्याच्या भावनेतून उभी केलेली चळवळ म्हणजे....**
**सोशल 100 फाउंडेशन**

SOCIAL 100 FOUNDATION ™
समाजाकडून समाजासाठी
रजि.महा./430/2020/

संघर्ष.. गोरगरिबांच्या लेकरांच्या शैक्षणिक विकासासाठीचा




# सोशल 100 फाउंडेशन
रजिस्टर नंबर : REG.MAH/430/2020/



## काय आहे सोशल 100 फाउंडेशन

शिव – फुले – शाहू, आंबेडकर आणि कर्मवीर आण्णांसारख्या अनेक महापूरुषांनी बहुजनांच्या शैक्षणिक विकासासाठी उपसलेल्या कष्टांची जाणीव ठेवून आणि मानवतावादी विचारधारेला साक्षी ठेऊन, ११ एप्रिल २०२०, महात्मा फुले यांच्या जयंती दिनी गोरगरिबांच्या लेकरांच्या शैक्षणिक विकासासाठी **'Social-100 Foundation'ची** (SHF / Social) स्थापना झाली. संघटने सोबत वेगवेगळ्या ३५ पेक्षा जास्त क्षेत्रात कार्यरत असलेले संपूर्ण महाराष्ट्रातून सभासद मंडळी जोडली गेली आहेत आणि त्यांचा आकडा १५०० पेक्षा जास्त असून या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे.

**महात्मा फुले म्हणतात,**
**विद्येविना मती गेली, मतीविना गती गेली,**
**गतीविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले,**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले.**

शिक्षण ही मानवी जीवनाची गुरुकिल्ली आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे ह्या विचारांचा पुरस्कार करणारे महात्मा फुले हे प्रथम भारतीय होते. महात्मा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगासमोर सर्व भारतीयांना सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची मागणी केली. अशा अनेक महापुरुषांचा आदर्श समोर ठेऊन ही संस्था स्थापन केली आहे. मुख्यत: गोरगरिबांची मुलं शिकली पाहिजेत हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवून आमची धडपड चालू आहे. लढाई सोपी नाही पण... सोशल–१०० फाऊंडेशनचे स्वप्न आहे, भविष्यात उभ्या महाराष्ट्रात शिक्षणासाठी पैसे नाहीत म्हणून गुणवत्ता असणारे कुठलेही गोरगरिबाचे लेकरु, त्या लेकराचा बाप, माय माऊली आत्महत्या करणार नाही...!

### फक्त कल्पना करा !

**महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई, महर्षी आण्णासाहेब कर्वे ह्या महामानवांनी स्वत:च्या कुटुंबाचा आणि वैयक्तिक हाल अपेक्षांचा विचार ही न करता बहुजणांसाठी स्वत:ला गाडूण घेतले.**

**ह्या महामानवांनी बहुजणांच्या शिक्षणासाठीचे कार्यच केले नसते तर...?**

**शिक्षण**

**संघर्ष..** गोरगरिबांच्या लेकरांच्या शैक्षणिक विकासासाठीचा

## Vision / दुरदृष्टी

शिक्षणाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्यायावर आधारलेली, जात , धर्म, प्रांताच्या पलिकडे गेलेली, विषमता विरहीत समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

## Mission/ मिशन

व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या 250 हुन अधिक विद्यार्थ्यांना दरवर्षी सोशल 100 फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती देणे. शिक्षणाची प्रचंड आस असणारा महाराष्ट्रातील कुठलाही विद्यार्थी शिक्षणासाठी पैसे नाहीत म्हणून आत्महत्या करणार नाही असा विश्वास तळागाळातील विद्यार्थ्यांप्रती निर्माण करणारे व्यासपीठ तयार करणे.

## Goal/ ध्येय

सामाजिकतेची जाण आणि भान असणारे, नैतिकतेने नोकरी व्यवसाय करून उदरनिर्वाह करणारे, मानवतावादी विचारांवर भरोसा असणारे, मानवतावादी विचार समर्थन करणारे, कोणत्याही जाती, धर्म, प्रांताचे कट्टर नसलेले 5000 सदस्य संघटनेबरोबर जोडणे.

# संस्थेने केलेल्या कामाची काही क्षणचित्रे...

### आई-वडील नसलेल्या विद्यार्थ्यांना 'एज्युकेशन किट'चे वाटप









### कोरोना काळात गरजु कुटूंबांना 'रेशन किट'चे वाटप





# शिष्यवृत्ती वाटपची काही क्षणचित्रे...



शिष्यवृत्ती वाटप – २०२१-२२

| | | | |
|---|---|---|---|
| २०२१-२२<br>९ विद्यार्थी<br>१.२९ लाख | २०२२-२३<br>२३ विद्यार्थी<br>४.५ लाख | २०२३-२४<br>५१ विद्यार्थी<br>१० लाख | २०२४-२५<br>८६ विद्यार्थी<br>१८ लाख |




शिष्यवृत्ती वाटप – २०२२-२३










शिष्यवृत्ती वाटप – २०२३–२४








शिष्यवृत्ती वाटप – २०२४–२५

# काही प्रतिक्रिया...


सकाळ

## सोशल हंड्रेड फाउंडेशनचा विद्यार्थ्यांना मदतीचा हात

### पाच जिल्ह्यातील ८४ जणांना उच्च शिक्षणासाठी १८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती

**वेल्हे, ता. ९ :** राजगड तालुक्यातील युवकांनी एकत्र येत सोशल मीडियाच्या माध्यमातून महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून ११ एप्रिल २०२० रोजी सोशल हंड्रेड फाउंडेशनची स्थापना केली. यावर्षी संस्थेत महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ३५ क्षेत्रातील १४०० पेक्षा अधिक सदस्यांच्या माध्यमातून गोळा केलेल्या सामाजिक कृतज्ञता निधीच्या माध्यमातून पाच जिल्ह्यातील ८४ विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी १८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

उद्योजक व लेखक शरद तांदळे ...च्या हस्ते पुणे येथील अण्णा ... साठे सभागृहात रविवारी (ता. ...) ...क्रम पार पडल्याची माहिती ...फाउंडेशनचे संस्थापक ... छत्रपती

पुणे : अण्णा भाऊ साठे सभागृहात शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व मान्यवर.

शिवरायांनी ज्या भूमीतून स्वराज्याची मुहूर्त मेढ रोवली त्या राजगड तालुक्याच्या मातीतील युवकांनी एकत्र येत छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, क्रांतिसूर्य महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन सोशल मीडियाच्या माध्यमातून सोशल हंड्रेड फाउंडेशन ही संघटना उभी केली आहे.

समाजातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत परिस्थिती असणाऱ्या गुणवंत व प्रतिभावंत विद्यार्थ्यांना केवळ पैशांमुळे उच्च शिक्षण थांबू नये, म्हणून उच्चशिक्षित तरुणांनी एकत्र येत सुरू केलेल्या फाउंडेशनमध्ये चौदाशेपेक्षा अधिक सभासद असून हे सभासद प्रत्येक महिन्याला संघटनेच्या खात्यामध्ये दरमहा शंभर रुपये पाठवत असतात. त्यातूनच उपलब्ध होणाऱ्या सामाजिक कृतज्ञता निधीच्या माध्यमातून पुणे, नाशिक, नगर, सोलापूर, सातारा या पाच जिल्ह्यातील ८४ विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

“ देशातील फक्त पासष्ट ते सत्तर टक्के शाळा या सरकारी राहिलेल्या आहेत. शिक्षणव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात होणारे खाजगीकरण हे समाजातील विषमता वाढविण्यासाठी पूरक ठरणार आहे. गोरगरिबांची गरजू आणि गुणवत्ताधारक असलेली मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, हा संस्थेचा प्रयत्न आहे.
**-संतोष चोरघे पाटील,** संस्थापक, सोशल हंड्रेड फाउंडेशन

**दृष्टिक्षेपात...**
२०२१-२०२२ मध्ये ९ विद्यार्थ्यांना १.२९ लाख रुपये शिष्यवृत्ती वाटप.
२०२२-२०२३ मध्ये २३ विद्यार्थ्यांना ४.५ लाख रुपये शिष्यवृत्ती वाटप.
२०२३-२०२४ मध्ये ५१ विद्यार्थ्यांना १० लाख रुपये शिष्यवृत्ती वाटप.
२०२४-२०२५ मध्ये ८४ विद्यार्थ्यांना १८ लाख रुपये शिष्यवृत्ती वाटप.

यावेळी शरद तांदळे यांच्या हस्ते ८४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक उच्चशिक्षणासाठी १८ लाख रुपये शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दत्ताजी कोहिनकर, तर प्रमुख उपस्थितीत निवृत्त जिल्हा न्यायाधीश आर.बी.चोरघे पाटील, ठाणे महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी कमलाकांत म्हेत्रे, यांच्यासह संघटनेचे सभासद, शिष्यवृत्तीधारक, विद्यार्थी व त्यांचे पालक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश डिंबळे यांनी, तर प्रास्ताविक अनिल वाघ यांनी केले. गणेश चोरघे यांनी आभार मानले.



**जुनियद तांबोळी,** भोर

माझे नाव जुनियद जानुमियाँ तांबोळी. मी सध्या बीई इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग या कोर्समध्ये सेकंड इयरला आहे. फर्स्ट इयरला असताना माझे अ‍ॅडमिशन कॅप थ्रू नवसह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन या कॉलेजला झाले. माझी आई ही नवसह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन येथे हाउसकीपिंगचे काम करते आणि वडील हे भारत पेट्रोल पंपावर वर्कर आहेत. परिस्थिती बिकट असल्याने शिक्षण घेणे थोडे कठीणच वाटले परंतु Social-100 Foundation यांनी हा प्रवास खूप सोपा केला. आपल्या Social-100 चे मी नेहमीच ऋणी राहील आणि भविष्यात या आपल्या Social-100 सोबत येऊन नक्कीच समाजातील परिस्तिथी नसल्यामुळे शिकु न शकणाऱ्या मुलांची साथ देईल अशी ग्वाही देतो. Thankyou Social-100...!

”



**अवंतिका बोऱ्हाडे,**
मंचर, ता. आंबेगाव

नमस्कार, मी अवंतिका दिपक बोऱ्हाडे मी BHMS च्या पहिल्या वर्गात शिकत आहे. Social-100 Foundation तर्फे माझी गुणवत्ता व परिस्थिती पाहून मला माझ्या BHMS साठी Scholership दिल्याबद्दल मी तुमचे खूप ऋणी आहे. तुम्ही जे गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी महान कार्य करत आहात त्यामध्ये आपल्या संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होवो. तुमच्या या कार्यामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळेल व शिक्षणासाठी मदत होईल. तुमच्या Scholership मुळे माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांना खूप फायदा झाला आहे. तुमचे कार्य हे वाखण्यासारखे आहे. तुम्ही जी Scholership दिली आहे यातून मी माझ्या आयष्याचे सोने करेल. जेव्हा मी माझ्या पायावर उभी राहील तेव्हा नक्कीच मी संस्थेचा वारसा पुढे नेण्यात खारीचा वाटा उचलेल. तुमच्या या कार्याला माझा सलाम व पूनच्छ एकदा आपले खूप खूप आभार...!!!

”



**रविना रेणुसे,** वेल्हा

नमस्कार, मी रविना रोहिदास रेणुसे. मी MBA च्या पहिल्या वर्षात शिकत आहे. मला वडिल नाहीत, माझी आई शेती करते. मला Social-100 ची Scholership मिळाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत गगनभरारी घ्यायची स्वप्न पाहणाऱ्या आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना तुम्ही स्कॉलरशिप देऊन आमच्या स्वप्नाना पंख देण्याचं काम केलत. आम्ही आता नव्या उमेदीने आमच्या स्वप्नांचा दिशेने भरारी घेऊ. आणि तुम्ही जशी आम्हाला मदत देऊ केली, आमच शिक्षण पूर्ण झाल्यावर तशीच मदत इतरांना करण्याचा प्रयत्न करू, आम्ही देखील या प्रवाहाचा भाग बनू. तुम्ही देऊ केलेल्या मदतीमुळे माझी कॉलेज ची फी भरण्यास मदत झाली. मी संपूर्ण Social-100 Foundationची खूप आभारी आहे.

”






**साक्षी भोसले,**
विंझर, ता. वेल्हा

आमच्या गरजेच्या काळात तुमच्याकडुन मिळालेल आर्थिक पाठबळ अमुल्य आहे. तुम्ही केलेल्या मदतीमुळे गोरगरिबांच्या मुलांमध्ये शिक्षण घेण्यासाठी नवी उमेद मिळत आहे.

## " शिष्यवृत्ती ते नोकरी....! "

मी ऋतुजा राजेंद्र पायगुडे - पुणे. मला आई वडील दोन्ही नाहीत. माझा सांभाळ माझे मामा करतात. नुकतीच मी MBA (FINANCE) ही डिग्री प्राप्त केली आहे. Social 100 Foundation ने मला M BA साठी शिष्यवृत्ती दिली होती. मी MBA passout झाल्यावर जॉब शोधत होते. परंतु जॉब शोधताना खूप अडचणी आल्या. मला जवळपास दोन ते तीन महिने जॉब मिळाला नाही. मी Social-100 Foundation चे अध्यक्ष संतोष चोरघे सरांबरोबर संपर्क केला. सरांनी माझ्या फिल्डशी संबंधित संघटने मधील अनेक सभासदांना मला जॉब मिळवा यासाठी प्रयत्न करायला सांगितले आणि खूप लोकांनी माझ्यासाठी प्रयत्न देखील केले. मी त्या सर्व सभासदांचे मनापासून आभार मानते. संतोष चोरघे सर, सी.ए. प्रशांत रसाळ सर, विशाल चोरघे सर, राजू माने सर, सी.ए. सागर चोरघे सर, संतोष गुरव सर या सर्वांनी माझ्यासाठी प्रयत्न केले. त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानते. मला राजू माने सरांनी ' Exl Service Limited ' या मल्टी नॅशनल कंपनीमध्ये referal केले. Exl या नामांकित मल्टी नॅशनल कंपनीमध्ये माझी निवड झाली आहे. मी राजू माने सरांचे आभार मानते. गेले 2 महिने सर्व सभासदांनी मला जॉब मिळवा म्हणून खुप सहकार्य केले. आज मला Exl मध्ये जॉब मिळाला. माझ्या या यशात Social 100 Foundation टिमचा सहभाग आहे. Social फक्त आपल्याला शिष्यवृत्ती देत नाही तर आपल्याला सक्षम देखील बनवते . मी ह्या संस्थेतील एक घटक आहे याचा मला खूप अभिमान वाटतो. Thank You, Social 100 Foundation...!

**ऋतुजा राजेंद्र पायगुडे - पुणे**

**विनम्र आवाहन...!**

विदारक परिस्थितीची जाण आणि भान ठेऊन तुम्ही तुमच्या उत्पन्नातील दरमहा रुपये 100/- फक्त आपल्याच गोरगरिब बांधवांच्या शिक्षणासाठी खर्च करु शकत असाल तर तुम्ही फक्त एकच करा....

Social-100 Foundation

मध्ये सहभागी होऊन व्हाट्सअ‍ॅप ग्रुप मध्ये सहभागी व्हा. तुम्ही सामाजिक कृतज्ञता निधी म्हणून दिलेले दान हे अगदी निप:क्षपणे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या गोरगरिबांच्या लेकरांपर्यत पोहोचवू आणि भारताला

ए पी जे अब्दुल कलामांच्या स्वप्नातील महासत्तेकडे घेऊन जाऊ.

**"The best brains of the nation may be found on the last benches of the classroom."**

- APJ Abdul Kalam



## संघटनेबरोबर सभासद जोडण्याचा निकष :

- आपल्या उदरनिर्वाहासाठी नैतिकतेने पैसे कमावणारी कुठलीही व्यक्ती संघटनेची सभासद होऊ शकते. संघटनेच्या कर्यात सहभागी होऊ शकते.
- संघटना फक्त शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे आणि संघटना सध्या सभासदाच्या संख्येअभावी फक्त पुणे जिल्ह्यात (अनाथ विद्यार्थ्यांसाठी नाशिक, अ.नगर, सोलापूर आणि सातारा) कार्यरत आहे.
- संघटनेबरोबर जोडला गेलेला प्रत्येक सभासद दर महिन्याच्या १ ते ५ तारखेदरम्यान संघटनेच्या बँक अकौंटवरती सामाजिक कृतज्ञता निधी म्हणून रुपये १००/- फक्त पाठवत असतात. प्रत्येक सभासदाला संघटनेकडून दर महिन्याला जमा होणाऱ्या एकूण सामाजिक कृतज्ञता निधीचा बँक स्टेटमेंटसह हिशोब पाठवला जातो.

## Social-100 Foundation साठी तुम्ही देत असलेल्या देणगीरुपी योगदानाचे पुढे काय होणार आहे ?

- गोरगरिबांच्या लेकरांच्या शैक्षणिक विकासासाठी मदत करणे.
- **विनियोग :** Social-100 Foundation मध्ये दर महिना जमा होणाऱ्या निधीचा विनियोग हा अगदी १००% गोरगरिबांच्या लेकरांच्या शैक्षणिक विकासासाठीच खर्च केला जाईल.
- **निकष :** गरज आणि गुणवत्ता हाच एकमेव निकष असेल.
- **निवड :** Social-100 Foundation व्यवथापनाने एक निवड समिती तयार केली आहे. सदर निवड समिती आलेल्या अर्जांतुन विद्यार्थ्यांची निवड करेल. निवड करताना समिती लिंग, जात, धर्म पाहणार नाही. समिती फक्त गरज (६०%) आणि गुणवत्ता (४०%) पाहूनच विद्यार्थ्यांची निवड करेल.
- **अर्ज कसा करावा :** Social-100 Foundation ने विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या स्कॉलरशीप साठी एक अर्ज संस्थेच्या वेबसाईटवर तयार केलेला आहे, तो अर्ज भरुन द्यावा लागेल.
- **अर्ज भरण्याची तारीख काय असेल :** ऑगस्टमध्ये वेबसाईटवर अर्ज उपलब्ध राहतील.
- **स्कॉलरशीप कधी दिली जाईल :** निवड झालेल्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप नोव्हेंबर मध्ये दिली जाईल.

**टिप : शिष्यवृत्ती फक्त चेक स्वरूपातच दिली जाईल. शिष्यवृत्ती चेक हा विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या संस्थेच्या नावाने दिला जाईल. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य हे फक्त निवड समितीलाच राहिल.**

**(तुमच्या सुचना संघटनेच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी मौल्यवान असतील)**

sanskruti2012@gmail.com

संघर्ष.. गोरगरिबांच्या लेकरांच्या शैक्षणिक विकासासाठीचा

सर्व्हे नं. ३५/२/१, भिडे पॅकिंग समोर, आंबेगाव बु., पुणे ४११०४६

9762901033 / 9923469319 / 8796155915
9970785223 / 8600340342 / 7588291372

social100foundation.org
social100foundation.com
social100foundation.in